

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved
Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES


VOL. 4 NO. 1 JAN. 2018
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**
On the Occasion of One Day National Conference On

## WOMEN EMPOWERMENT CHALLENGES AND SOLUTIONS

27th January, 2018

(Book IV)



*Editor*
**Mr. Eshwar L. Rathod**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF SOCIOLOGY
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

# CONTENTS


| | | |
|---|---|---|
| 1. लिंगभाव, विकास आणि महिलांचे योगदान | प्रा. श्रीमती के. व्ही. काकडे | 06 |
| 2. महिला चळवळीचो सामाजिक आणि राजकोय वाटचाल | प्रा. मनिषा किर्तने | 08 |
| 3. स्त्री विकासात महिला चळवळीचे योगदान | डॉ. किषोर उत्तमराव राऊत | 10 |
| 4. महिला सबलीकरणासाठी सुरक्षित कायदे आणि उपाय | प्रा. कुकडे सुनिता जगन्नाथरा<br>डॉ. भिसे आर.एम. | 13 |
| 5. कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया: एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. आलटे शशिकांत मुकुंदराव | 16 |
| 6. 21 व्या शतकातील आधुनिक स्त्रियांचे प्रश्न...! | प्रा. डॉ. संदीप रामराव गोरे | 19 |
| 7. कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ.मस्के दिलीप सिताराम | 22 |
| 8. महिला सबलीकरणा करता कौटुंबीक हिंसा आणि प्रतिबंधक.... | प्रा. डॉ. अनुराधा खाडे | 24 |
| 9. कौटुंबिक हिंसाचार ही एक ज्वलंत समस्या | डॉ. वी. डी. पवार | 26 |
| 10. महिला सबलीकरणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान... | डॉ. प्रतिभा अहिरे | 29 |
| 11. हुंडा समस्येचा जातीव्यवस्था आणि धर्माशी असलेला संबंध आणि ... | प्रा. डॉ. गोरे बी.एम | 33 |
| 12. स्त्रीवादी अभ्यास विकास आणि स्त्रीया | श्रीमती जाधव एस. टी. | 35 |
| 13. शेती अर्थव्यवस्था आणि स्त्रिया | रशिदा बेगम शेख रहेमतुल्ला | 37 |
| 14. स्त्रीवादी अभ्यास, विकास आणि स्त्रिया | डॉ. अप्पाराव रामराव वागडव | 39 |
| 15. भारतीय समाजव्यवस्था आणि स्त्रिया | प्रा. डॉ. असिया चिश्ती | 42 |
| 16. जागतिकीकरणाचा भारतीय समाजातील स्त्रियांवर झालेला परिणाम ... | प्रा.डॉ.चंद्रशेखर एस.पाटील | 46 |
| 17. हुंडा पध्दती महिला मानवाधिकारांचे उल्लंघन | डॉ. एन. बी. कदम | 49 |
| 18. स्त्री-पुरुष असमानता : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. दामावले डी.एन. | 52 |
| 19. शेती अर्थव्यवस्था आणि स्त्रिया विशेष संदर्भ बीड जिल्हा | डॉ. यादव घोडके | 55 |
| 20. प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया | डॉ. विठ्ठल भिमराव मातकर | 59 |
| 21. कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया - | डॉ.जिजाबाई कांगणे | 61 |
| 22. भारतीय संस्कृति परंपरा और स्त्रियाँ | प्रा. डॉ. कुलकर्णी वनिता | 63 |
| 23. मराठी कवयित्रींचे काव्य आणि महिला सबलीकरण | प्रा. डॉ. हनुमंत माने | 66 |
| 24. महिला सुरक्षेत महिला आयोगाची भुमीका | डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | 69 |
| 25. कौटुंबीक हिंसाचार आणि स्त्रिया | डॉ. मुंडे बाळासाहेब विश्वनाथ | 72 |
| 26. स्त्रियांच्या मानवी हक्कांबाबतची चळवळी | प्रा. सुषमा अर्जुन जाधव | 74 |
| 27. शेती अर्थव्यवस्था आणि स्त्रियांचा सहभाग | प्रा. पल्लवी इरलापल्ले | 77 |
| 28. कौटुंबिक हिंसाचार स्त्रिया व प्रतिबंधात्मक कायदा | बोकडे भगवंत चंद्रकांत | 80 |
| 29. जागतिकीकरण आणि स्त्रिया | प्रा. डॉ. गायके एस.के | 81 |
| 30. महिला सबलीकरण आणि महिला विषयक कायदे | प्रा. ईश्वर राठोड | 84 |
| 31. कौटुंबिक अत्याचार : एक सामाजिक चिंतन | प्रा. नागोराव संभाजी भुरके | 86 |
| 32. भारतातील स्त्री भ्रूण हत्त्या एक अभ्यास | प्रा. भोसले ए.आर. | 88 |
| 33. उद्योग - स्त्री सबलीकरण | प्रा. सागर लोकनाथ वडगे | 90 |
| 34. कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रीया | प्रा. उगीले माधव उत्तमराव | 93 |
| 35. हुंडा -प्रथा, समाज आणि स्त्रिया | डॉ. मिसाळ हनुमंत | 95 |
| 36. महिलांच्या सामाजिक चळवळी | डॉ. आनंदा भिकुजी काळे | 100 |
| 37. हुंडाप्रथा: एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. विद्या खंडारे -गोवंदे | 102 |
| 38. महिला सबलीकरण : आव्हाने व उपाय | प्रा.तुकाराम कोल्हे | 104 |
| 39. लिंगभाव विषमता आणि पारधी स्त्री | प्रा. नंदकिशोर उकंडराव राऊत | 106 |
| 40. कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रीया | प्रा.डॉ. विठ्ठल कांबळे | 109 |
| 41. कौटुंबीक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. तांदळे सुरेंद्र सुंदरराव | 111 |
| 42. 19 व्या शतकातील साहित्य क्षेत्रातील स्त्रीयांचे प्रतिबिंब | प्रा.स्निग्धा आर. कांबळे | 113 |




Scanned with OKEN Scanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

30.

# महिला सबलीकरण आणि महिला विषयक कायदे

प्रा. ईश्वर राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब.

**प्रस्तावना :**

भारतात परिवर्तनाची प्रक्रिया खऱ्याअर्थाने स्वातंत्र्यानंतर सुरू झाली. 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वातंत्र झाला व भारतासाठी एक नवीन आराखडा बनवण्याची प्रक्रिया सुरू झाली. पहिल्या टप्प्यात देशातील सर्व नागरीकांना समानतेची ग्वाही देणारी, सामाजिक, आर्थिक, व राजकीय न्याय देणारी, धर्म आणि मतांचे. 'स्वातंत्र्य देणारी राज्यघटना' स्विकारण्यात आली. लिंग 'समानतेचे तत्व' निर्माण करून स्त्री आणि पुरूष दोघांनाही समान हक्क जाणीवपूर्वक बहाल केले गेले. कायद्यापुढे सर्वांना समान मानून मानसाला न्याय देण्याचा प्रयत्न झाला. महिला सबलीकरणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरापासून प्रयत्न करण्यात आले. भारतीय राज्यघटनेने दिलेल्या स्त्री-पुरूष समानतेमुळे काय परिवर्तन झाले? याचा जेव्हा अभ्यास करण्यात आला तेव्हा महिलांना भोगाव्या लागणाऱ्या भीषण समस्येकडे, विषमतेकडे लक्ष वेधले गेले. याच काळात जागतिक पातळीवर देखील महिलांच्या परिस्थितीविषयी चार्चा सुरू होती. या चर्चेतून संयुक्त राष्ट्र संघाने 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. याच काळात भारत सरकारने 1975 ते 1985 हे दशक आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून घोषित केले. व 8 मार्च हा महिला दिन म्हणून घोषित केला.

थोडक्यात महिलांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणून महिला सक्षमीकरणाचा उद्देश साध्य करण्यासाठी शासनाच्या प्रत्येक स्तरावरून प्रयत्न करण्यात आले आहेत.

**महिला सबलीकरण म्हणजे काय ?**

भारताच्या दृष्टीकोनातून महिला सबलीकरण संकल्पना अत्यंत महत्वपूर्ण आहे. सर्वसाधारणपणे महिला सबलीकरण म्हणजे, 'स्त्री नावाचा भारतीय समाजातील घटकाला आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सामावून घेणे व तसा समाज निर्माण करणे होय. 'सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक दृष्टीकोनातून केल्या जाणाऱ्या सुधारणांमधुन स्त्रीला एक व्यक्ती म्हणून संबोधून स्त्रीयांच्या दृष्टीने परिवर्तन होणे ही सबलीकरणाची अट आहे. मोझर यांच्या मते, "दुसऱ्यावर स्वामित्व प्रस्थापित करण्यापेक्षा संघटीत होऊन अंगभूत क्षमतांची आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने विकास करून निर्णायक प्रश्नाबावत निर्णय घेणे व संसाधनांवर नियंत्रण प्रस्थापित करणे आणि अडवणुकीला आव्हान देणे म्हणजे सबलीकरण होय,"

महिला सबलीकरण ही संकल्पना भिन्न-भिन्न संथ्यांने वापरली जाते. कधी ती समानता, कल्याण, क्षमतावृध्दी दारिद्र्य निर्मूलन या अर्थाने वापरली तर कधी अन्यायाचा प्रतिकार करणे, साहसी वृत्ती, आत्मविश्वास या अर्थाने देखील वापरली जाते. स्त्रियांचा राजकीय क्षेत्रातील वावर, त्या सरकारी निमसरकारी अथवा खाजगी क्षेत्रात अधिकारांच्या जागेवर असणे तसेच स्त्रियांनी सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये, पुढाकार घेणे या गोष्टी स्त्री सबलीकरणाच्या निर्देशक आहेत.

**शासनाने महिलांसाठी केलेले कायदे :**

वैदिक काळातील सुधारित स्त्रीजीवन उत्तर वैदिक काळात अतिशय खडतर बनले या प्रवासाला अंतच नव्हता. मात्र ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाली आणि त्यांनी केलेल्या सुधारणा, धोरणाचे संपूर्ण समाजावर व्यापक परिणाम घडून आले. समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल झाला. ब्रिटिशांनी आपल्या कालखंडात स्त्रियांच्या उध्दारासाठी अनेक कायदे केले. जसे बालहत्या प्रतिबंधक कायदा, सतीबंदी कायदा, विधवा पूर्नविवाह कायदा, स्त्री बालहत्या प्रतिबंधक कायदा, वारसा हक्क कायदा, घटस्फोटाचा कायदा, देवदासी प्रतिबंधक कायदा इत्यादी कायदे भारत स्वतंत्र होण्यापूर्वी निर्माण केले गेले.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारताने महिलांच्या सबलीकरणासाठी अनेक कायदे केले. या कायद्यामुळे आज स्त्रियांच्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात बरेच परिवर्तन झाले आहे. काही कायद्यांमुळे महिलांनाही पुरूषांसारखे समान अधिकार मिळाले तर काही कायद्यांमुळे महिलांना त्यांच्या शोषणापासून मुक्ती मिळाली आहे. काही कायदे महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी झालेले आहेत. तर काही कायदे महिलांच्या संरक्षणासाठी झालेले आहेत. यातील काही ठराविक कायदे, महिला अत्याचाराशी संबंधित कायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1) हिंदू कोड बिल :-**

महिलांसंबंधाच्या कायद्यांचा अभ्यास करताना हिंदू कोड बिल काय आहे हे समजून घेणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या कल्याणासाठी हिंदूकोड बिलाची निर्मिती केली. त्यांनी हिंदूकोड बिलाचे चार निरनिराळे भाग करून महिलांना वेगवेगळ्या प्रकारे संरक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे.



Scanned with OKEN Scanner

अ) हिंदू विवाह कायद्या (1955) नुसार मुलांचे आणि मुलींचे लग्नाचे वय निश्चित करण्यात आले. तसेच स्त्रीला घटस्फोट घेण्याचाही अधिकार प्राप्त झाला.

आ) हिंदू वारसा हक्क कायद्या (1956) नुसार वारसा हक्काने प्रत्येक स्त्रीला सासरच्या व पतीच्या संपत्तीतील हिस्सा दिला गेला. त्यामुळे स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली.

इ) हिंदू अज्ञान व पालकत्व कायद्या (1956) नुसार स्त्रीचे पालकत्वाचे अधिकार वाढवून तिला पुरूषांच्या बरोबरीने आपल्या अज्ञान मुलांच्या बाबतीत पालकाचे हक्क लाभले आहे.

स्त्री संरक्षणाच्या दृष्टीने हिंदू कोड बील बाबासाहेबांनी दिलेली एक महान देणगीच आहे.

**2) हुंडा प्रतिबंधक कायदा (1686) :**

"1961 मध्ये सर्वात प्रथम हुंडा प्रतिबंधक कायदा निर्माण केला गेला मात्र या कायद्याचा प्रभाव पाहिजे तसा पडला नाही. म्हणून सन 1984 मध्ये यात दुरूस्ती करून 1985 मध्ये हा कायदा लागू केला गेला. यात हुंड्यासाठी कमीत कमी 6 महिने ते 2 वर्षापर्यंत शिक्षा व 10 हजार रूपये दंड ठोकावण्यात आला. 1986 मध्ये यात पुन्हा दुरूस्ती करण्यात आली व हुंडाबळींचा मृत्यू म्हणून स्वतंत्र्य गुन्ह्याची नोंद करण्यात आली. आजही दर दोन तासाला एक हुंडाबळी ठरत आहे. "आणि ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे. मात्र या कायद्यामुळे काही प्रमाणात हा होईना समाज जागृत झाला आहे. तसेच सुशिक्षित स्त्रिया हुंडा देण्याच्या व घेण्याच्या विरोधात आहेत.

**3) गर्भधारणापूर्व आणि जन्मपूर्व निथन तंत्र (लिंग निवड प्रतिबंध ) कायदा (1994) :**

गर्भवती महिलेच्या जिवास धोका असेल किंवा गर्भामध्ये काही समस्या असतील तर जन्मपूर्व चाचण्या काही अटींची पूर्तता करून करण्याची संमती 1994 च्या कायद्याने दिली आहे. मात्र मुलगीच नको म्हणून या चाचण्या करून मुलीचा गर्भ काढून टाकण्याची प्रवृत्ती मागील काही वर्षात फारच वाढली आहे. या पार्श्वभूमीवर जन्मपूर्व लिंग निदान प्रतिबंधक कायदा 2003 मध्ये पास करून घेण्यात आला. लिंग परिक्षण करणे व मुलीचा गर्भ काढून टाकणे हा गुन्हा ठरविण्यात आला. 2011 च्या जनगणनेनुसार "महाराष्ट्रात दरहजारी पुरूषांमागे 929 स्त्रीया आहेत." 2001 च्या जणगणनेत हेच प्रमाण 933 इतके होते.

**4) घरगुती हिंसेपासून महिला संरक्षण अधिनियम (2005)**

महिलांना दिलासा देणारा 'कौटुंबिक हिंसाचार-2005' या नव्या कायद्याची अमंलबजावणी 26 ऑक्टोबर 2006 पासून झाली आहे. या कायद्याअंतर्गत महिलांना शारीरिक, भावनिक, आर्थिक, हुंड्याची बेकायदेशीर मागणी व लैंगिक छळापासून संरक्षण मिळणार आहे. या गुन्ह्यानुसार आरोपींना एक वर्ष सक्षम कारावास, 20 हजार रूपये दंड ठोठावला जाणार आहे. व हा गुन्हा आजिमनपात्र राहील. या कायद्यामुळे स्त्रियांचे घरातील वास्तव्य अबाधित राहणार आहे. व लग्नाशिवाय एकत्र राहणाऱ्या महिलांनाही याचे संरक्षण मिळणार आहे.

**निष्कर्ष :**

"थोडक्यात या समितीच्या स्थापना प्रत्येक कार्यालयात झाली पाहिजे यासाठी महाराष्ट्र महिला आयोग प्रशिक्षण शिबीर घेत आहेत. अशा पध्दतीने महिला सबलीकरणासाठी शासनाकडून कायद्याच्या माध्यमातून वेगवेगळे प्रयत्न केले जात आहेत. जेव्हा एखाद्या स्त्रीवर अशा प्रकारच्या छळ होतो तेव्हा आपली समाजव्यवस्था स्त्रीयानांच दोषी ठरवत असते. पण कोणत्याही गोष्टींची शहानिशा न करता आपण जेव्हा एखाद्या स्त्रीला दोषी ठरवित असतो तेव्हा तिच्या खाजगी, सामाजिक आयुष्यावर काय परिणाम होतो याच देखील आपण विचार केला पाहिजे. अशा प्रसंगी ती स्त्री स्तब्ध होते, तिची विचार करण्याची क्षमताच नष्ट होते. परिणामी तिचा विकास खुंटतो, तिची प्रगती होत नाही. तेव्हा एक सुजान् नगरिक म्हणून आपले कर्तव्य आहे की, आपण त्या स्त्रीला आधार दिला पाहिजे. कोणत्याही प्रसंगाची खात्री न करता तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविणे चुकीच आहे. कारण एका कर्तृत्ववान स्त्रीची अधोगती होणे म्हणजे, तेथील कार्यालयाची व आपोआपच समाजाची अधोगती होते हे लक्षात घेतले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. गोटे शुभांगी (2004), महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
2. कुलकर्णी पी.के (प्र.आ.1998), भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.251.
3. दै. लोकमत, दि. 23 जानेवारी 2016.

❑❑❑



Scanned with OKEN Scanner